**प्रेसनोट दिनांकः-१७/०८/२०१९**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**गुन्हा करून पळून जाणा-या चोरटयांना बंडगार्डन पोलीसांनी सिने स्टाईलने केले जेरबंद**

मनोज रमेश महाजन,रा.कोंढवा हे दिनांक १६/०८/२०१८ रोजी पहाटे ०३/३० वा.चे सुमारास सेंट्रल बिल्डींग जवळील बस स्टॉपवर कोंढवा येथे जाण्यासाठी वाहनाची वाट पहात उभे होते. त्यावेळी दोन इसम काळया ॲक्टीव्हावरून त्याठिकाणी आले व त्यांनी मनोज महाजन यांना मारहाण करून, त्यांचेकडील मोबाईल व पैसे काढून घेतले. सदर इसम बंडगार्डन पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी येत असताना,त्याला पेट्रोलींग करणारे पुणे स्टेशन मार्शल दिसले. त्यांना मनोज महाजन यांनी घडलेला प्रकार सांगत असताना, थोडया अंतरावर जिल्हाधिकारी कार्यालयाचे बस स्टॉपजवळ, त्याचेकडून पैसे काढून घेणारे दोघे इसम एका व्यक्तीचे पैसे काढून घेण्याचा प्रयत्न करीत असताना दिसले. सदर इसमाने इशारा करून मार्शलला सांगितले हेच ते दोघे आहेत. मार्शलचे पोलीस कर्मचारी त्यांना पकडण्यासाठी जात असताना, सदर दोन्ही इसमांना पोलीस येत असल्याचे लक्षात आल्याने पळून जावू लागले. पुणे स्टेशनचे मार्शलने त्यांचा सिने स्टाइल पाठलाग करीत त्या दोघांना पकडून, त्यांचेकडून मोबाईल व ॲक्टीव्हा गाडी ताब्यात घेतली. मनोज रमेश महाजन,रा.कोंढवा यांनी दिलेल्या तक्रारीवरून बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात नमुद दोन इसमांना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची चांगली कामगिरी पुणे स्टेशन पोलीस चौकीचे मार्शल पोना.विवेकजगताप व पोलीस शिपाई अकबर कुरणे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर**